सामान्य प्रशासन विभाग

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक ७ ऑक्टोबर २०१४.

**अधिसूचना**

**परक्राम्य संलेख अधिनियम,१८८१.**

क्रमांक सार्वसु.१११४/प्र.क्र.३४३/२०१४/२९. -- परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ (१८८१ चा २६) च्या कलम २५ मध्ये दर्शविलेल्या व भारत सरकारच्या गृह मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक ३९/१/६८ – जेयूडीएल- तीन, दिनांक ८मे १९६८ अन्वये महाराष्ट्र शासनास सोपविण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन याद्वारे सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने बुधवार, दिनांक १५ ऑक्टोबर २०१४ रोजी राज्यात सार्वजनिक सुट्टी जाहीर करीत आहे.

२. मंत्रालयातील सर्व प्रशासकीय विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांनी कृपया या अधिसूचनेतील सदर तरतूद त्यांच्या प्रशासकीय विभागाच्या नियंत्रणाखालील मंडळे/ महामंडळे इत्यादी निमशासकीय कार्यालयांच्या निदर्शनास आणावी व त्यांच्या कर्मचा-यांनाही वरील सवलत देण्याबाबत सूचना द्याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्र.प्र.गोसावी,**

शासनाचे उप सचिव.

क्रमांक सार्वसु.१११४/प्र.क.३४३/२०१४/२९,
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ७ ऑक्टोबर २०१४.

प्रत माहितीकरिता रवाना
आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका

**र.ग.पांचाळ,**

शासनाचे अवर सचिव.

--------

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

कार्यालय

पाहिले.

प्रस्तुत अधिसूचनेच्या प्रती सर्व खातेप्रमुख व सहाय्यक आयुक्त यांना माहितीकरिता व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता पाठवाव्यात.

| | | | |
|---|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- | सही/- |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी | उप आयुक्त (सा.प्र.) | अतिरिक्त आयुक्त (शहर) | आयुक्त |

महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय
क्र.प्रकअ/६९/सर्वसा(एमओपी/४८१९)
दि. १३.१०.२०१४.

प्रत: ----------------------------------------यांस (-----------------जादा प्रतीसह)

माहितीकरिता व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता कृपया अग्रेषित.

सही/-१३.१०.१४
प्रशासकीय अधिकारी (आयुक्त)